सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 342 ठ. क्र. 290 दि. 29/12/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३४२

बहुजन क्रांती संयोजन समिती सोलापूर यांचे वतीने संविधानाच्या सन्मानार्थ बहुजन क्रांती मोर्चा दि.२७ डिसेंबर २०१६ रोजी काढण्यात येणार आहे. सदर मोर्चाच्या विसर्जन सभेसाठी होम मैदानाची मागणी करण्यात आली होती. तथापी दिनांक १५ डिसेंबर २०१६ ते ३१ जानेवारी २०१७ अखेर होम मैदान श्री सिध्देश्वर यात्रेसाठी श्री सिध्देश्वर पंच कमिटी, सोलापूर यांच्या ताब्यात देण्यात येते. तरी महानगरपालिकेच्या मालकीचे असलेले पार्क स्टेडीयम दि.२७/१२/२०१६ रोजी बहुजन क्रांती मोर्चाच्या विसर्जन सभेसाठी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मामुली~~/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ता.१/३५२ ठ. क्र. 299
दि. 29.12.16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

ता.१/३५२

सोलापूर शहरातील पाणी पुरवठयासाठी उजनी धरणातून भिमा नदीत पाणी सोडण्याबाबत प्रस्तावात सविस्तर माहिती असून,प्रस्तावात नमूद कारणास्तव

१) माहे जानेवारी २०१७ मध्ये सोलापूर शहरात ग्रामदैवत श्री. सिध्दरामेश्वर यांची मोठया प्रमाणात यात्राभरते. या यात्रा कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हयातून तसेच कर्नाटक व आंध्र प्रदेश राज्यातून मोठया प्रमाणात भाविक सोलापूर शहरात येतात. त्यामुळे शहरात या यात्रा कालावधीत तरंगत्या लोकसंख्येच्या प्रमाणात मोठया प्रमाणात वाढ होते.
मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांनीही या संदर्भात पत्र दिले असून ते प्रस्तावासोबत समाविष्ट आहे. तात्काळ युध्दपातळीवर वरिष्ठ स्तरावरुन मा.पालक मंत्री व मा.महापौरांसह पदाधिकारी यांचे समवेत मा.जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे बैठक आयोजित करुन तात्काळ भिमा नदीमार्गे टाकळी पर्यंत पाणी सोडणेबाबत चर्चा करणे आवश्यक वाटते.

२) मा.जिल्हाधिकारी यांचे संदर्भ क्र. २ चे पत्रानुसार औज व टाकळी येथील पाणी जास्तीत जास्त दिवस पुरविण्याचे अनुषंगाने तातडीने आजपासून शहर व हद्दवाढ भागाचा पाणी पुरवठा दोन दिवसाआड ऐवजी चार दिवसाआड करणे उचित राहणार आहे.
आजच्या आज तातडीने निर्णय होऊन त्या अनुषंगाने दि. १८-१२-२०१६ पासूनचे पाणी पुरवठयाचे नियोजनात दोन दिवसाआड पाणी पुरवठा ऐवजी चार दिवसाआड पाणी पुरवठा नियाजनाप्रमाणे बदल करणे आवश्यक असल्यानेसदरचा विषय हा आजच्या म्हणजे दि. १७-१२-२०१६ च्या महासभेत तातडीचा विषय घेणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक १७-१२-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

चार दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचा प्रस्ताव नाकारण्यांत येत आहे. सध्या शहराला दोन दिवसाआड पाणी पुरवठा करण्यांत येत आहे. यावर्षी चांगला पाऊस झालेला आहे. उजनी धरण १०० टक्के पेक्षा अधिक भरलेले आहे. सध्या पाणी मुबलक आहे. सोलापूर शहरातील नागरिकांसाठी औज बंधा-यातून वर्षातून चार वेळेला पाणी सोडण्याचे मा.शासनाचे धोरण आहे. यावेळी हिप्परगा येथेही पाणी मुबलक आहे. सोलापूरकरांना पाणी कमी पडू दिले जाणार नाही अशी सभागृहामध्ये हमी देण्यांत आली आहे. या सर्व बाबींचा विचार करुन माहे जानेवारी २०१७ पासून शहराला एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्यांत यावा.

सध्या नियमानुसार मा.शासनाच्या जलसंधारण विभागाकडून नियमितपणे सर्वत्र पाणी पुरवठयाचे नियोजन आहे. त्याचप्रमाणे सोलापूर शहरातील उजनी धरणातून अन्य बंधारा अथवा तलावात पाणी सोडण्याचे नियोजन आहे. त्या नियोजनानुसार सध्या औज बंधारा येथे पाणी सोडण्यांत येत आहे. माहे जानेवारी, २०१७ हा मकर संक्रात्रीचा पवित्र सण असल्याने यानिमित्ताने उजनी धरणातील आजच्या पाण्याच्या साठयाचा विचार करता, सोलापूर शहराला एक दिवसाआड पाणी पुरवठा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/खास/सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. तात-११/३६२ ठ. क्र. २९२
दि. २९/१२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-११/३६२

NTPC अर्थसहाय्य सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना ७५ MLD उजनी धरण उद्‌भव समांतर पाईप लाईन घालणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मजीप्राने सादर केलेले सदर कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु. २५२.२८ कोटी निव्वळ व रु. २६४.८९ कोटी ढोबळ इतक्या रक्कमेच्या DPR ला मंजूरी तसेच २ % Preparation charges व ३ % PMC charges असे एकूण ५ % सेवाशुल्क मजीप्रास अदा करणेस तसेच ५ % सेवाशुल्काच्या एकूण रक्कम रु. १२.६१४ कोटीच्या १० % आगावू रक्कम रु. १.२६ कोटी मजीप्राकडे भरणा करणेस मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १७-१२-१६ चे टिपणीने आलेले प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

**तसेच वाढीव २% रक्कमेमुळे इतर तद्‌अनुषंगिक बाबीमुळे होणारी वाढ ही NTPC कडून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.300..ठ. क्र..283
दि..29/12/16...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



विभागीय कार्यालय क्र. २ कडील एकवट मानधनावरील अवेक्षक (स्थापत्य) मुदतवाढ बाबत श्री.सावस्कर आशुतोष प्रकाश अवेक्षक स्थापत्य यांचे मुदतवाढ व एकवट मानधन रूपये १२,०००/- ऐवजी रूपये २०,०००/- इतके करणेबाबत सबब प्रस्तावात नमुद वस्तुस्थितीचा विचार होऊन ,प्रस्तावात नमूद कारणास्तव श्री. सावस्कर आशुतोष प्रकाश अवेक्षक स्थापत्य यांचे पुढील मुदतवाढ मिळणेस व तसेच त्यांना रूपये. २०,०००/- मानधन अदा करणेस मान्यता असावी, तसेच प्रस्तावात नमूद प्रमाणे १) कु. कदम प्रणोती आर-न.अ. २) पेरमपल्ली ए.ए. अवेक्षक (स्थापत्य) यांनाही र. रू. १२,०००/- ऐवजी रूपये २०,०००/- एकवट मानधन अदा करावे किंवा कसे असे याबाबत आदेश व्हावेत आणि त्यांना रू.२०,०००/- मानधन द्यावयाचे झाल्यास त्याप्रमाणे सदरचा प्रस्तावही मा.स्थायी समिती मार्फत मा.म.न.पा कडे निर्णयास्तव पाठविणेस व मा. म.न.पा ठरावानुसार ठरावाच्या दिनांकापासून अदा करणे योग्य राहील असे मा. सहा. आयुक्त (स) यांनी प्रस्तावित केले असून त्यानुसार मा. आयुक्त यांचे दि.२/१०/१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. म.न.पा.कडे मान्यतेस्तव मा.स्थायी समिती ठराव क्र. ६६६ दि.२५/११/२०१६ च्या शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

श्री. आशुतोष सावस्कर यांची मुदत ज्या तारखेला संपलेली आहे त्या तारखेपासून मुदतवाढ देणेस व त्यांना देण्यांत येत असलेले मानधन र.रु. १२,०००/- ऐवजी र.रु. २०,०००/- याप्रमाणे वाढवून देण्यांसही मान्यता देणेत येत आहे. आणि श्री. केतन बाळासाहेब कलकेरी व कु. धानम्मा विश्वनाथ करपे (बी.ई.मेकॅ.) यांची ही अवेक्षक म्हणून कंत्राटी/मानधनावर नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 309 ठ. क्र. 298
दि. 29/12/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे आर्थिक स्थिती भयंकर बिकाटीची असून सदर उपक्रमाकडील सेवकांचे वेतन दोन ते तीन महिने थकित आहे. आजला परिवहन उपक्रमाकडे एकूण अंदाजे ९०० कर्मचारी असून त्यापैकी कायम कर्मचारी अंदाजे ५०० असून, बदली सेवक अंदाजे १०० आहेत व उर्वरित सेवक हे कंत्राटी चव रोजंदारी आहेत. आजला परिवहन उपक्रमाचे नियमित उत्पन्न व नियमित खर्च याची तुलना केली असता, परिवहन उपक्रमास सरासरी प्रतीदिनी अंदाजे रू. १ ते १.५ लाख इतकी तुट सहन करावी लागत आहे. परिवहन उपक्रमाची स्थिती पाहता तेथील कर्मचाऱ्यांची मानसिक स्थिती फारच बिकट झालेली आहे. तेथील सेवकांना त्यांचे जमा रक्कमेच्या प्रा.फंडातून त्यांच्या कुटुंबाकरीता शैक्षणिक, दवाखाना इ. अनेक कारणास्तव कर्ज मागणी केली असता कर्ज देणेत येत नाही. त्यामुळे कित्येक कर्मचारी हे आत्महत्यासारखे प्रकार केलेले आहेत.

सदर उपक्रमाचे गांभीर्याने विचार केल्यास परिवहन उपक्रम हे सोलापूर महानगरपालिकेचे एक अंगीकृत विभाग असून सोलापूर महानगरपालिकेच्या सेवकांना ज्या सुविधा व वेतन देण्यात येते तेच सुविधा व वेतन परिवहन उपक्रमाच्या सेवकांना देणे अनिवार्य आहे.

परंतु त्याप्रकारची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. परिवहन उपक्रमाच्या सेवकांना `नेहमीच म.न.पा.कडून दुजाभावाची वागणूक दिली जाते. आजला परिवहन उपक्रमाचे कामकाज हे मनपाकडील अधिकारी यांचेमार्फत करणेत येते व परिवहन उपक्रमाचे वार्षिक अंदाजपत्रकदेखील मनपाकडून मंजूर करणेत येते. यासर्व गोष्टींचा विचार करता, सोलापूर महानगरपालिकेकडे आजला अनेक आस्थापना सूचीतील पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील सेवकांचे त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार म.न.पा.कडे वर्ग करणेस्तव यापूर्वी अनेकवेळा मा. परिवहन समितीमार्फत व मा. सर्वसाधारण सभेमार्फत शिफारस करणेत आल्याचे समजते.

आजला परिवहन उपक्रमाकडील कायम व हंगामी सेवक यांना महानगरपालिकेकडे त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार सेवावर्ग केल्यास आजला परिवहन उपक्रमास जो नियमित तुट सहन केरावा लागत आहे ते पूर्णपणे बंद होवून परिवहन उपक्रम हे असलेल्या कंत्राटी सेवकांमधून चालविल्यास परिवहन उपक्रम हे निश्चितच फायदयामध्ये राहील.

तरी सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील हंगामी व कायम सेवकास त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार सोलापूर महानगरपालिकेकडे असलेल्या रिक्त पदी तातडीने सेवावर्ग करून घेणेस ही सभा मान्यता देत असून त्याप्रमाणे सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव निर्णय घेणेस मा. परिवहन समिती ठराव क्र. ५५, दिनांक १७-११-२०१६ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा.आयुक्त यांनी सविस्तर अभिप्रायसह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.302 ठ. क्र. 295
दि. 29/11/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र.१४ जूने विठठ्ल मंदिर येथे सभा मंडप बांधणे कामाचे प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करणेत आलेले पूर्वगणनपत्रक क्र.७/१ रक्कम रूपये २८,१४,५६३/- यांस मा.स्थापत्य समितीची मान्यता मिळून मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे कामी मा. आयुक्त यांचे दि.९/११/१६ चे टिपणीप्रमाणे आलेल्या प्रकरणी मा.स्थापत्य समिती ठराव क्र.३१३ दि.२५/११/१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी कमी पडणारी रक्कम ही सन २०१६-१७ भांडविली कामे मागील कामासाठी कमी पडणारी रक्कम या तरतूदीतून जादा र.रू.१०.०० लाख तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.303 ठ. क्र.......299
दि.29.12.2016....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३०३

प्र.क्र.६ जयभवानी प्रशाला इमारत दुरूस्ती करणे कामाचे प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करणेत आलेले पूर्वगणनपत्रक क्र. ४५/२०१५-१६ र.रू ३०,११,८५४/- यांस व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे बजेट तरतूद उपलब्ध होऊन मा.स्थापत्य समितीची शिफारस होऊन मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि.२८/१०/२०१६ चे टिपणीप्रमाणे आलेल्या प्रकरणी मा.स्थापत्य समिती ठराव क्र. ३१४ दि.२५/११/२०१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात ही सभा मान्यता देत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 308 ठ. क्र. 256
दि. 29/12/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र. क्र. २२ मध्ये पोलिस मुख्यालय मैदानामधून जाणा-या नाल्याची पाईप लाईन करून बंदिस्त करणे कामाचे प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करण्यात आलेले पूर्वगणनपत्रक क्र.६४ सन २०१६-१७ र.रू ४०,९७,७६२/- यास व र.रू १२.३० लाख (३०% म.न.पा हिस्सा) इतक्या (जास्तीत जास्त निधी म्हणजेच र.रू. २८.७० लाख इतका शासकीय निधी उपलब्ध होईल असे गृहीत धरून ) प्रस्तावात नमूद केले प्रमाणे बजेट तरतुदीस मा.स्थापत्य समिती मार्फत अंतिम मान्यता मिळणेकामी मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मा. आयुक्त यांचे दि.१५/११/२०१६ चे टिपणीप्रमाणे आलेल्या प्रकरणी मा.स्थापत्य समिती ठराव क्र.३१७ दि.२५/११/२०१६चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सन २०१६-१७ मधील भांडवली कामाचे तक्त्यातील ड्रेनेज/स्ट्रमलाईन घालणे या कामी तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.304.ठ. क्र.....295
दि.29/12/16...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३०५

प्रभाग क्र. २६ मधील होम मैदान येथील सालाबादाप्रमाणे यात्रा काळामध्ये लाल मातीचे रस्ते करणे व इतर कामे करणे कामाचे प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करणेत आलेले पूर्वगणनपत्रक क्र. र.रू ६,३१,५००/- यांस मा.स्थापत्य समितीची मान्यता मिळून प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे बजेट तरतूद उपलब्ध होणे कामी मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मा.आयुक्त यांचे दि.१४/११/२०१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा.स्थापत्य समिती ठराव क्र.३१८ दि.२५/११/१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सन २०१६-१७ मधील भांडवली कामातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 306 ठ. क्र. 211
दि. 29/12/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३०६

संत शिरोमणी श्री सावतामाळी शेतकरी आठवडे बाझार अभियान राबविण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रातील मोकळया जागा कृषी पणन मंडळास भाडेपटट्याने उपलब्ध करून देणेकामी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे अनुक्रमांक १ ते ५ जागेच्या तपशील दर्शविणेत आला असून प्रस्तावात नमूद कारणास्ताव आठवडयातून एकदाच शनिवारी किंवा रविवारी अशा प्रकारे शेतकरी आठवडा बाजार राबविणेत येणार असून हा बाजार भरवताना होणारा खर्च व नियंत्रणाची पूर्ण जबाबदारी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांची राहणार आहे. सदर विभागाकडून भाडेपटट्ा पोटी मासीक अंदाजे र.रू.३,००,०००/-(तीन लाख) ते र.रू ४,५०,००० पर्यंत भाडे म.न.पा.स उत्पन्न अपेक्षित आहे.

तरी सदर योजनेसाठी मा.जिल्हा कृषी अधिकारी पुणे यांच्या मार्फत मागणी करण्यात येणारे सोलापूर महानगरपालिकेच्या मालमीची मोकळी जागा भाडे कराराने उपलब्ध करून देणे संबंधी अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव प्रकरण मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मा.आयुक्त यांचे दि.१९/११/२०१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका